REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

संत जनाबाईच्या अभंगातील भावोत्कटता

प्रा. डॉ. अनिल गर्जे
प्रमुख, मराठी विभाग, गांधी महाविद्यालय, कडा
ता. आष्टी, जि. बीड.

प्रस्तावना :-

वारकरी संप्रदायात अनेक संत कवयित्री होऊन गेल्या. सर्व संत कवयित्रीमध्ये जनाबाईंचे स्थान वेगळे आहे. जनाबाईंचे 350 अभंग श्री सकल संतगाथेमध्ये प्रसिद्ध आहेत. परभणी जिल्हयातील 'गंगाखेड' या खेडेगावात जनाबाईचा जन्म झाला. पाच–सहा वर्षाची जनाबाई असताना तिचे मायेचे छत्र हरपले. नामदेवांचे वडील दामाजी जनाबाईचा सांभाळ करतात. अनेक बरे–वाईट अनुभव ती पचवते. धीर गंभीरपणे जनाबाई स्वतःला नामदेवाच्या आणि विठ्ठलाच्या सेवेत गुंतवून घेते. संत नामदेवांच्या सहवासात ती स्वतःला धन्य समजते. नामदेवांचे कवित्व तिला मोहिनी घालते. विठ्ठल भक्तीची आस तिला लागलेली आहे. विठ्ठल भक्तीची आस तिला लागलेली आहे. विठ्ठल भक्तीचे द्वार तिच्यासाठी खुले होते. ती स्वतःला धन्य समजते. संत नामदेव तिचे आदर्श बनतात. 'नामयाची दासी जनी' असे त्या शीलतेने म्हणतात. त्यांचे उभे आयुष्य पंढरीत संत नामदेवांच्या घरी व्यतीत झाले. जनाबाईची अभंगवाणी मोठी रसाळ व भाव मधुर आहे. भावोत्कटता काठोकाठ भरलेली आहे. उदाहरणार्थ,

ये गं ये गं विठाबाई, माझे पंढरीचे आई।
भीमा आणि चंद्रभागा । तुझे चरणींच्या गंगा।।
इतुक्या सहित त्वा बा यावे। माझे रंगणी नाचावे।।
माझा रंग तुझिया गुणी। म्हणे नामाची जनी।।

दळिता कांडीता गुज गाईन अनंता।
मी तो समर्थांची दासी । मिठी घालीन पायासी

अशी सौम्य, संयत व आर्त–उत्कृष्ट रचना जनाबाईची आहे. जनाबाई विठ्ठलाच्या जनाबाई विठ्ठलाच्या रूपातून प्रेमभाव रुजविण्याचा प्रयत्न करते. विठ्ठल प्रेमाचा भुकेला आहे. 'आळविता धाव घाली। ऐसी प्रेमाची भुकेली।।' (श्रीसकल संतगाथा, 27) भिल्लीण बोरे चोखून चांगली बारे देवाला देते. देव तिची उष्टी बोरे मोठया आवडीने खातो. त्याठिकाणी तिच्या अतःकरणातील भाव शुद्ध आहे.

भिल्लणीची फळे कैशी। चाखोनी वाहातसे देवासी।।
भावे तिची अंगीकारी । सर्वांहूनी कृपा करी।।
गुज वानरांसी पुरावे। राक्षसाते हो जिंकावे।।

श्रद्धापूर्वक भावनेने केलेले कोणतेही काम पूर्णत्वास जाते हे जनाबाई आवर्जून सांगते. जनाबाईला आईची माया विठ्ठलाजवळ मिळते. त्याच्या भक्तीरंबात ती दंग होते. जीवनातील सर्व दुःखाचा तिला विसर पडतो.

विठ्ठलाजवळ ती मन मोकळे करते. आईचे प्रेम विठ्ठलाकडून मिळते. जनाबाई म्हणते,

पक्षी जाय दिगंबरा। बाळकांसी आणि चारा।।
घार हिंडते आकाशी। झाप घाली पिल्लापाशी।।
भाता गुंतली कामासी। चित्त तिचे बाळापाशी।।
वान हिंडे झाडावरी। पिली बांधून उदरी।।
तैसी आम्हासी विठ्ठल माये। जनी वेळोवेळी पाहे।।'
(श्रीसकल संतगाथा, 89)

संत जनाबाईंनी विठ्ठलाला मोठया आर्तभावननेन आळविते विठ्ठलाबद्दलचा जिव्हाळा तिच्यात ओतप्रोत भरलेला दिसून येतो. जनाबाईंची अभंगवाणी प्रबळ आणि उत्कट भावानुभूतीची अभिव्यक्ती आहे. त्यातील आवेग आणि उत्कटतेमुळे ती भावकवितेचे रूप घेते. उत्कटतेमुळे अभंगाचे रुप सौंदर्यात अधिक भर पडली आहे. विठ्ठलाला आईची उपमा जनाबाई देते. या उत्कट भावनेला काव्यात्म रूप प्राप्त होते.ते असे –

दळू भांडू खेळू। सर्व पाप ताप जाळू।।
सर्व जीवनामध्ये पाहू। एकं आम्ही होऊनी राहू।।
जनी म्हणजे ब्रह्म होऊ। ऐसे सर्वाधारी पाहू।। (अभंग क्र–317)

जनाबाईचे सर्वच अभंग उत्कट आहेत.'धरीला पंढरीचा चोर। गळां बांधोनिया दोर। हृदय बंदिखाना केला। आत विठ्ठल कोंडिला।।' हा नाटयात्म भावही काही अभंगातून आविष्कृत होतो. जनाबाईच्या अभंगांना भावगीताची किनार लाभलेली आहे. भक्तीचा मूर्तिमंत आविष्कार म्हणजेच जनाबाईचे अभंग आहेत. ल. रा. पांगारकर म्हणतात, ''जनाबाईचे अभंग श्रीकृष्णाच्या मुरलीसारखे आहेत.''भक्तीची उर्मी ही जनाबाईच्या अभंगाची मुळ प्रेरणा आहे. तसेच वैचारिक दृष्टिकोनातून त्यांच्या अभंगांचे मोल अधिक आहे. नामदेवाच्या भक्ती योगाचा मार्ग जनाबाईंनी निवडला. आपल्या अभंगातून भक्तीचे रसपान ती सर्व सामान्यांना घडविते ते असे,

मी तो समर्थाची दासी। मिठी घालीन पायासी।।
हाची माझा दृढभाव। करीन नामाचा उत्सव।।
आम्हा दासीचे हे काम । मुखी विठ्ठल हरिनाम।।
सर्व सुख पायी लोळे। जनी संगे विठ्ठल खेळे।।

जनाबाईची भक्ती कसोटीला उतरली.'जनी म्हणे देवा। तू असता पाठीशी। नाही भय चिंता आम्हालागी।।' जनाबाईच्या शब्दात कोठेही पांडित्य नाही तर अंतरीचे उमाळे आहेत. कोणत्याही प्रकारचा अभिनेवेश नाही तर तेथे वाहत्या पाण्याची निर्मलता जनाबाईच्या विठ्ठल भक्तीत आहे.

सर्वांना समानतेने अनुभवने व सर्वांच्या ठायी विठ्ठलाला अनुभवने ही जनाबाईची अद्वैत भक्ती होय. जनाबाईच्या निष्काम भक्तीचा आनंद घेण्यासाठी विठ्ठल जनाबाईजवळ जातात. तिच्या कामात मदत करतात.

दळिता कांडिता तुजा गाईन मी अनंता।
न विसंबे क्षणभरी तुझे नाम गा मुरारी।।
नित्य हाची कारभार मुखी हरि निरंतर।
माय–बाप बंधू वहिनी तू बा सखा चक्रपाणी।।
लक्ष लागले चरणासी म्हणे नामयाची दासी।।

जनाबाईची विठ्ठल भक्ती ही सामान्य कोटीतील भक्ती नव्हती तर अलौकीक अशी होती. दळण कांडन करताना जनाबाईचा भक्तीचा मळा फुलून येतो. विठ्ठलाला अळवतांना ती ओव्या गाते.

सुंदर माझे जाते गे फिरे बहुतेंके।
ओव्या गाऊं कौतुके तूं येरे बा विठ्ठला।। (अभंग क्र.225)

विठ्ठल भक्तीने जनाबाईस जीवनातील सहज स्थितीकडे नेले. जगण्याची उमेद दिली आहे. ती केवळ केवळ नामदेवाची दासी म्हणून वावरत नाही, तर विठूही जिचा दास होतो. एवढा तिचा भक्तिभाव आहे. तिची ही भावकविता विठ्ठलाच्या प्रेमाने ओतप्रोत भरली आहे. स्त्री जन्म मिळाला म्हणून ती उदास होत नाही. नाराज नाही. स्त्रीत्वाची जाणीव त्यांच्या अभंगात ओझे म्हणून येत नाही.

स्त्री जन्म म्हणवूनी न व्हावे उदास।
साधुसंता ऐसें केले जनी।।
संतांचे घरची दासी मी अंकली।
विठोबाने दिली प्रेमकळा।।
नामायाची जनी भक्तीतें सादर।
माझें ते साचार विटेवरी।।

संत नामदेवावरील भक्ति–प्रेमभाव, विठ्ठलाविषयीचा उत्कट भक्तिभाव त्यांच्या अभंगातून काठोकाठ भरलेला दिसून येतो. कधी–कधी जनाबाई देवाशी भांडते. पण त्या भांडणातही भक्ती, वात्सल्य, ऋतुजा, कोमलता, आढळून येते. अभंगाची लडिवाळ भाषा सर्वसामान्यांच्या हृदयाला थेट भिडते. अनुभूतींचा साक्षात्कार म्हणजे जनाबाईचे अभंग आहेत. अनुभवाची खोली व सूक्ष्मता जनाबाईच्या अभंगातून दिसून येते. काव्य आणि अध्यात्म यांचा सुरेख संगम जनाबाईच्या अभंगात स्पष्ट दिसतो. भक्तीला बेडरपणा दिसून येतो.

डोईचा पदर आला खांद्यावरी। भरल्या बाजारी जाईन मी।।
हाती घेईन टाळ खांद्यावरी वीणा। आता मज कना कोण करी।।
पंढरीच्या पेठे मांडियेले पाल। मनगटावर तेल घाला तुम्ही।।
जनी म्हणे देवा, मी झाले येसवा।
निघाले केशवा, घर तुझे।।

सुहासिनी इर्लेकर म्हणतात,''जनाबाईच्या संवेदनक्षम मनातील सात्त्विक संतापाचा हा हा स्फोट आहे.'' तर डॉ. शिवाजीराव मोहिते म्हणतात, ''जनाबाईचा हा रांगडया बोलीभाषेतील हा अभंग तिच्या मनातील तो एक अनामिक भावनेचा उद्रेक आहे.'' ही तिची विरोधाभक्ती आहे. विठ्ठल भक्तीचे प्रचंड पाठबळ जनाबाईकडे होते. जनाबाईचे अभंग साधे, सरळ व सोपे आहेत. परमेश्वर भेटीची आर्त तळमळ व अगतिकता अभंगातून दिसून येते. विठ्ठलभक्तीचे सहजस्फूर्त, उत्कट आविष्कार साधणारे जनाबाईचे अभंग विलोभनीय आहेत. त्यात भक्तीचे शास्त्रशुद्ध प्रतिपादन नसले तरी, परमेश्वर भक्तीची तळमळ, त्याच्या भेटीची ओढ व्यक्त होते. अंतरीचे दुःख ती विठ्ठलाजवळ सांगते. विठ्ठलाच्या प्रेमाने ती विठ्ठलमय होऊन जाते. तिची भक्ती भोळाभाबडी असली तरी आर्त आहे, शुद्ध आहे.

निष्कर्ष :

1. संत जनाबाईच्या अभंगातील भावना अतिशय उत्कट आवेशपूर्ण असून अभंगांना कल्पनाशक्तीची व्यापकता, विचारसौंदर्य, आणि आशयाची व्यापकता त्यात दिसून येते.
2. जनाबाईच्या ठिकाणी व्यापक, सर्वस्पर्शित्व, जाज्वल्य जीवननिष्ठा आणि उत्कट भक्तिभाव आहे.
3. जनाबाईंच्या अभंगातील उत्कटता हा गुण त्यांच्या अभंगवाणीचा प्राण ठरलेला आहे.
4. अभंगांचे रुपसौंदर्य उत्कटतेमुळे खुलून आल्याचे दिसून येते.
5. जनाबाईच्या अभंगांचा विषय आध्यात्मिक असला, तरी त्यातून व्यक्त होणारे स्त्रीजीवन व स्त्रीमनाचे अनुभव विश्वाबरोबर लौकिक जीवनाचे शब्दचित्र आविकृत होते.

संदर्भ ग्रंथसूची :

1. इर्लेकर सुहासिनी, जनाबाईचे निवडक अभंग, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2008.
2. मोहिनी शिवाजीराव, संत जनाबाईचे निवडक अभंग, कर्मवीर प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जून 2005.
3. फलके दत्तात्रय (संपा.), संत वाटिकेतील जाईची वेल : संत जनाबाई, यशोदीप पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, एप्रिल 2015.
4. गोसावी र. रा., पाच भक्ति संप्रदाय, प्रतिमा प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, 2008.
5. काटे मिलिंद, संत जनाबाई चरित्र आणि अभंग, अनुराधा प्रकाशन, पैठण प्रथमावृत्ती, 2006.
6. साळवे शशिकांत, संत साहित्य : शोध आणि बोध, शब्दश्री प्रकाशन, जुन्नर, प्रथमावृत्ती, 2015.